आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. १६३

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१६ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

माझे नांव–विद्या बबन उघडे

वय – ३४ वर्षे, व्यवसाय– नोकरी (बँक ॲग्रीकल्चरल ऑफीसर)

रा. अहमदनगर

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.पटेकर यांचेमार्फत</u>–**

सेंट्रल बँक ऑफ इंडीयामध्ये मी ११.९.२०१७ रोजी रुजु झाले. सन २०१९ ते २०२२ मध्ये मी वडझीरे शाखेत ॲग्रीकल्चरल फिल्ड ऑफीसर म्हणुन कार्यरत होते. गौतम जाधव बँकेत बँक मित्र होता. बँक मित्राचे काम लोकांच्या ठेवी स्विकारणे, पैसे काढुन देणे तसेच सरकारी योजनांचा लाभ मिळवुन देणे असे असते. बँकेत गौतम जाधव विरोधात काही लोकांच्या त्यांच्या खात्यातुन पैसे विथड्रॉ झाल्यासंदर्भात, ट्रान्स्फर झाल्यासंदर्भात तसेच खोटया पावत्या दिल्याबाबत तक्रारी आल्या होत्या. हेड ऑफीसला आरोपी विरोधात फ्रॉड झाल्याबाबत लोकांच्या तक्रारी गेल्या होत्या. त्याच्यानंतर काय झाले हे आठवत नाही. अजुन काही झाले होते का हे आठवत नाही. त्यानंतर आरोपी विरोधात पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवली. मला कधी बोलावले हे मला आठवत नाही. माझा जबाब दि.८.८.२०२२ रोजी झाला. माझा जबाब माझ्या सांगितल्याप्रमाणे पोलीसांनी घेतला होता. त्यानंतर पोलीसांनी पंचनाम्यावेळी पोलीस स्टेशनला माझ्या सहया घेतल्या होत्या. आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये S85 to S90 पर्यंतचे हस्ताक्षर नमुने दाखवण्यात आले. त्या माझ्या सहया असुन त्या माझ्या सहया पोलीसांनी पोलीस स्टेशनला पंचांसमक्ष घेतल्या होत्या. सदर S85 ते S90 पर्यंतच्या मुळ सहयांच्या नमुन्यास **ओळखीसाठी नि.१६४ ते १६९** देण्यात येते. आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये S91 to S102 पर्यंतचे हस्ताक्षर नमुने दाखवण्यात आले. त्यामध्ये माझ्या सहया नाहीत. सदर S91 ते S102 पर्यंतच्या मुळ सहयांच्या नमुन्यास **ओळखीसाठी नि.१७० ते १७५** देण्यात येते. आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये S103 to S114 पर्यंतचे हस्ताक्षर नमुने दाखवण्यात आले. त्यामध्ये माझ्या सहया

नाहीत. सदर S103 ते S114 पर्यंतच्या मुळ सहयांच्या नमुन्यास **ओळखीसाठी नि.१७६ ते १८१** देण्यात येते. आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये S115 to S126 पर्यंतचे हस्ताक्षर नमुने दाखवण्यात आले. त्यामध्ये माझ्या सहया नाहीत. सदर S115 ते S126 पर्यंतच्या मुळ सहयांच्या नमुन्यास **ओळखीसाठी नि.१८२ ते १८७** देण्यात येते. आरोपी बँकेत माझ्या कार्यकाळात कामास असल्यामुळे मी त्याला ओळखते. तो आज न्यायालयात हजर आहे.

(सरकारी वकीलांनी सदर साक्षीदारास रंजना मोरे यांच्यासंदर्भात फितुर घोषीत करुन उलट तपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. त्यास आरोपीच्या वकीलांनी आक्षेप घेवुन सांगितले की सदर साक्षीदारास फितुर घोषीत करता येणार नाही.)

सदर साक्षीदाराचा सरतपास पाहता साक्षीदाराने सरतपासात अजुन काही झाले होते का हे आठवत नसल्याचे सांगितले आहे व तसेच सदर साक्षीदाराने तिच्या सरतपासात तिचा जबाब पोलीसांनी तिच्या सांगण्याप्रमाणे घेतला असल्याचे सांगितले आहे. सदर साक्षीदारास सरकारी वकीलांतर्फे रंजना मोरे या खातेदाराबाबत साक्षीदाराने काही सांगितले नसल्याने त्याबाबत उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली आहे. तरी सदर मागणीचे स्वरुप पाहता व खातेदाराशी निगडीत साक्षीदारास प्रश्न विचारायचे असल्याने त्यासंदर्भात सरकारी वकीलांना उलटतपासाच्या स्वरुपात परवानगी देणे योग्य होईल कारण आरोपीस सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी त्यासंदर्भात असणार आहे. त्यामुळे आक्षेप नामंजुर करण्यात येतो.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता तशी ती त्यांना देण्यात आली. सबब उलटतपास सुरु.**

हे म्हणणे खरे आहे की माझ्या पोलीसांसमोरील जबाबात रंजना मोरे यांनी दि.९.३.२०२० रोजी आरोपीच्या बँक खात्यावर ३,५०,०००/- रुपये विथड्रॉ स्लीपने विथड्रॉ केले व सदर महीलेने फिक्स डिपॉझीटसाठी पैसे दिले होते व सदर फिक्स डिपॉझीट करत असताना त्यावर माझी सही नसुन ती त्यानेच डुप्लीकेट सही केली व गौतम जाधव याने बँक मित्र म्हणुन काम करत असताना गैरव्यवहार केल्याचे

मी सांगितले होते.

**<u>उलटतपास आरोपीकरीता विधीज्ञ श्री.ए.पी.रोकडे यांच्यामार्फतः</u>**

वडझीरे शाखेत माझ्या अगोदर ॲग्रीकल्चरल ऑफीसर सुहास मडके असतील. मला बँकेत ७ वर्षे झाले. असीस्टंट ब्रँच मॅनेजर म्हणुन माझ्याकडे चार्ज नव्हता. ब्रँच मॅनेजर सोनाली जाधव होत्या. अपहाराचा कार्यकाळ मला माहीत नाही मात्र मी कार्यरत असताना अपहार निदर्शनास आला होता. बँकेविरुध्द आंदोलन केल्याचे मला सांगता येणार नाही. मी मागील ॲग्रीकल्चरल ऑफीसरकडुन चार्ज घेतल्यावर सगळे रेकॉर्ड तपासले होते. मी रेकॉर्डमध्ये तपासलेल्या फाईल्समध्ये काही मिसींग आढळले नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे काम शेतीशी व शेती कर्जाशी निगडीत होते. माझ्या कार्यकाळात सहाय्यक शाखाधिकारी नव्हते. हे म्हणणे खरे आहे की शाखाधिकारी रजेवर असताना त्यांचा चार्ज असीस्टंट मॅनेजर म्हणुन माझ्याकडे असायचा. दि.२६.३.२०२१ते ३.४.२०२१ मध्ये झालेल्या स्पेशल ऑडीटबाबत मला माहीती नाही व त्याचा रिपोर्ट मी पाहीला नाही. संदीप बिरादार यांनी तयार केलेला चौकशी अहवाल मी पाहीला नव्हता. माझ्या कार्यकाळात कॅशीयर म्हणुन बोरुडे होते व त्यांना काही दिवसांसाठी बँकेने निलंबीत केले होते. मी कॅशीयर म्हणुन ते निलंबीत असताना काम केले नाही. आता मला नि.१५८ वरील आरोपीचा राजीनामा दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की तो राजीनामा देतेवेळी मी कृषी अधिकारी होते. मी राजीनामा पाहीला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की आरोपीच्या राजीनाम्यानंतर आरोपी बँकेत कामास नसल्याबाबत पाटी लावली होती. राजीनामा दिल्यावर आरोपीचा बी.सी.कोड बंद केल्याचे मला सांगता येणार नाही.

प्रश्न– आरोपी राजीनाम्यानंतर बी.सी. म्हणुन बँकेत कामाला आला नाही?

उत्तर– आरोपी कस्टमर म्हणुन बँकेत आला होता.

हे म्हणणे खरे आहे की राजीनाम्यानंतर आरोपीस बँकेच्या काउंटरमध्ये येवु देणे कायदेशीर नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपीचा बी.सी. कोड बंद झाल्यावर त्याच्या कोडवरुन तो व्यवहार करु शकत नाही. आता मला नि.९५ वरील स्पेशल ऑडीट रिपोर्ट दाखवण्यात आला. त्या रिपोर्टमध्ये रंजना मोरे यांची एफडीआर

नं.११२७६ असल्याचे नमुद आहे. त्या ऑडीट रिपोर्टमध्ये माझा आयडी नंबर नमुद नाही.

उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(डॉ. एन.एस.सबनीस)

दिनांकः ०८/१०/२०२५. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,

पारनेर.